# नियमित दिवाणी दावा क्रमांक ६२५/२०२० मधील
# निशाण ३२ वरील आदेश

**शंकरराव विष्णू कोळी वगैरे–९ ................वादी**

विरुध्द

**पांडूरंग मारुती कोळी वगैरे–१२ ..............प्रतिवादी**

आणि

**१. नितीन गोपाळ गुरव,**
**२. निवास गोपाळ गुरव,**
**३. हरिदास गोपाळ गुरव,**
**४. कुसूम गोपाळ गुरव ...........तिऱ्हाईत इसम**

१. तिऱ्हाईत इसम यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १, नियम १० अन्वये त्यांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेबाबत दाखल केला आहे.

२. वादी यांनी या अर्जास निशाण ३३ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

३. प्रतिवादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

४. तिऱ्हाईत इसम यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांचा त्यांचे पूर्वजांपासून वाद मिळकतीमध्ये संबंध होता व आहे. वाद मिळकतीबाबत यापूर्वी झालेल्या दाव्यामध्ये तिऱ्हाईत इसम हे पक्षकार होते व त्या दाव्यामध्ये तिऱ्हाईत इसम यांची मिळकत होती. वाद मिळकतीबाबत झालेल्या निकालाबाबत संदिग्धता असल्याने ही केस मूळचे प्रतिवादी यांनी केलेली आहे. हा दावा गुणदोषांवर चालून न्यायनिर्णय होणे कामी तिऱ्हाईत इसमाचे म्हणणे ऐकून घेणे कायद्याने आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा व तिऱ्हाईत इसम

यांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील करुन घ्यावे, अशी विनंती तिऱ्हाईत इसम यांनी केली आहे.

५. वादी यांचे म्हणण्यातील कथनांप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द हा दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द तिऱ्हाईत इसमांनी यापूर्वी केलेले सर्व दावे, अपिले, सेकंड अपिल यांचा निर्णय वादी यांचेसारखा झालेला आहे. मा.ना.उच्च न्यायालय व मा.ना.सर्वोच्च न्यायालय यांचे निकाल ही वादी सारखेच झालेले आहेत. त्यामुळे, या दाव्याचे कामी तिऱ्हाईत इसम यांना अशा प्रकारचा अर्ज देण्याचा कोणताही हक्क व अधिकार प्राप्त होत नव्हता व नाही. तिऱ्हाईत इसम यांना हा अर्ज देणेस कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

६. प्रतिवादी यांचे म्हणण्यातील कथनांप्रमाणे दावा मिळकतीबाबत मा.ना.सर्वोच्च न्यायालयापर्यंत तिऱ्हाईत इसमांविरुध्द निर्णय झालेले असल्यामुळे दावा मिळकतीबाबत या दाव्याचे कामी त्यांना दाद मागता येणार नाही. वादीने हा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकिदीसाठी दाखल केला असून तिऱ्हाईत इसमाविरुध्द कोणतेही कारण निर्माण होत नसल्याने तिऱ्हाईत इसम यांना या दाव्याचे कामी सामील करुन घेता येणार नाही. केवळ दाव्याचे काम लांबणीवर पाडण्याच्या हेतूने तिऱ्हाईत इसम यांनी हा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

७. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

८. तिऱ्हाईत इसमांतर्फे विधीज्ञ श्री.टी.व्ही.जाधव, वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.जाधव व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.बी.गायकवाड यांचा युक्तिवाद ऐकला.

९. उभयपक्षकारांनी केलेली परस्पर विरोधी कथने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व

त्यावरील कारणमिमांसेसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | तिऱ्हाईत इसम यांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी तिऱ्हाईत इसम पात्र आहेत काय ? | **....नाही.** |
| २. | काय आदेश ? | **....अर्ज नामंजूर करणेत आला आहे.** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>**

**१०.** तिऱ्हाईत इसम यांचे कथनांनुसार त्यांचा दावा मिळकतीशी संबंध आहे. दावा मिळकतीबाबत त्यांचे आणि वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेल्या पूर्वीच्या प्रकरणातील निकालाबाबत संदिग्धता असलेने मूळचे प्रतिवादी यांनी हा दावा दाखल केला आहे. हा दावा गुणदोषांवर चालून न्यायनिर्णय होणेसाठी तिऱ्हाईत इसम यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. सबब, तिऱ्हाईत इसम यांना याकामी सामील करुन घेणेत यावे, अशी विनंती तिऱ्हाईत इसम यांनी केली आहे. याउलट, वादी व प्रतिवादी यांचे म्हणण्यातील कथनांनुसार त्यांचे आणि तिऱ्हाईत इसम यांचे दरम्यान यापूर्वी झालेले सर्व दावे, अपील, सेकंड अपील यांचा निर्णय त्यांचे बाजूने झाला असून तिऱ्हाईत इसम यांना दावा मिळकतीबाबत पुन्हा वाद उपस्थित करता येणार नाही. वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकिदीसाठी दावा दाखल केला असून दाव्याचे कारणाशी तिऱ्हाईत इसम यांचा कोणताही संबंध नव्हता व नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती वादी व प्रतिवादी यांनी केली आहे. उभयपक्षकारांनी केलेली परस्पर विरोधी कथने पाहता तिऱ्हाईत इसम या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत किंवा कसे, हे पडताळणे आवश्यक आहे.

**११.** वादी, प्रतिवादी आणि तिऱ्हाईत इसम यांनी केलेली एकंदरित कथने आणि अभिलेखातील कागदपत्रे पाहता वादी, प्रतिवादी आणि त्यांचे पूर्वहक्कदार यांनी तिऱ्हाईत इसम यांचे पूर्वहक्कदार गोपाळ मारुती गुरव वगैरे यांचेविरुध्द या दावा मिळकती संदर्भात या न्यायालयात रे.दि.मु.नं.२१/१९८४ चा दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला होता. तो दावा दि.०५.१२.१९९१ रोजीचे न्यायनिर्णय व हुकूमनाम्याने मंजूर करणेत आला व तिऱ्हाईत इसम यांचे पूर्वहक्कदार गोपाळ मारुती गुरव यांचेविरुध्द निरंतर ताकीद देणेत आली. त्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याविरुध्द तिऱ्हाईत इसम यांनी मे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सांगली यांचेकडे रे.दि.अपील नं.१२/१९९२ चे दाखल केले होते. त्या अपिलाकामी रे.दि.मु.नं.२१/१९८४ मधील दि.०५.१२.१९९१ रोजीचा न्यायनिर्णय व हुकूमनामा रद्द करणेत आला व दावा पुन्हा फेरचौकशीसाठी पाठविणेत आला. त्यानंतर या दाव्याची फेरचौकशी होऊन दि.०३.०८.२०१० रोजीचे न्यायनिर्णय व हुकूमनाम्याने दावा मंजूर करणेत आला व तिऱ्हाईत इसम यांचे पूर्वहक्कदार गोपाळ मारुती गुरव यांचेविरुध्द दावा मिळकती संदर्भात निरंतर ताकीद देणेत आली. त्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याविरुध्द गोपाळ मारुती गुरव यांचे वारस म्हणून तिऱ्हाईत इसम यांनी मे.जिल्हा न्यायाधीश–३, सांगली यांचेकडे रे.दि.अपील नं.२४३/२०१० चे दाखल केले. त्या अपिलाची गुणदोषांवर चौकशी होऊन ते अपील फेटाळण्यात आले व रे.दि.मु.नं.२१/१९८४ मधील न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम करणेत आला. त्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याविरुध्द तिऱ्हाईत इसम यांनी मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दुसरे अपील नं.६६/२०१३ चे दाखल केले होते. परंतु, ते अपील देखील दि.१५.०२.२०१३ रोजी फेटाळणेत आले. त्याविरुध्द तिऱ्हाईत इसम यांनी मा.ना.सर्वोच्च न्यायालय यांचेकडे स्पेशल लिव्ह पिटीशन नं. १८९०६/२०१३ चे दाखल केले होते. परंतु, ते पिटीशन देखील रद्द करणेत आले. याप्रमाणे वादी, प्रतिवादी आणि तिऱ्हाईत इसम यांचेदरम्यान

यापूर्वी या न्यायालयापासून मा.ना.सर्वोच्च न्यायालय येथेपर्यंत प्रकरणे चालून रे.दि.मु.नं.२१/१९८४ मधील दि.०३.०८.२०१० रोजीचा न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम करणेत आला आहे, असे स्पष्ट दिसून येते. उभयपक्षकारांदरम्यान याबाबत फारसा वाद नाही.

**१२.** दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांचे कथनांनुसार वादी, प्रतिवादी आणि तिऱ्हाईत इसम यांचे दरम्यान पूर्वी चाललेल्या वर नमूद प्रकरणांमध्ये वादी क्र.१ ते ९ आणि प्रतिवादी क्र.२ ते १२ यांना प्रत्येक तारखेस हजर राहणे शक्य नसल्याने व प्रतिवादी क्र.१ हा सुशिक्षीत व त्याला कायद्याबाबत थोडीफार माहिती असल्याने त्यांनी त्यांचे हक्क व अधिकार प्रतिवादी क्र.१ यांना दिले होते. परंतु, प्रतिवादी क्र.१ ने त्या अधिकाराचा गैरवापर करुन बेकायदेशीररित्या दावा मिळकतीला एकटयाच्या नावाची नोंद करुन घेतली आहे. त्याआधारे प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीतील वादी यांचे शांततामय समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत असून तो दावा मिळकत त्रयस्थ इसमांना तबदिल करणेच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द हा दावा दाखल करुन निरंतर ताकिदीची मागणी केली आहे. या दाव्याचे स्वरुप पाहता हा दावा वादी क्र.१ ते ९ व प्रतिवादी क्र.२ ते १२ आणि प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान त्यांचेतील दावा मिळकत संदर्भातील वादाबाबत आहे. त्यामुळे, त्या दाव्याशी व त्या दाव्यातील कारणाशी तिऱ्हाईत इसम यांचा कोणत्याही प्रकारे संबंध आहे, असे दिसून येत नाही.

**१३.** तिऱ्हाईत इसम यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वाद मिळकती संदर्भात पूर्वी झालेल्या प्रकरणांतील निकालाबाबत संदिग्धता असल्याने हा दावा दाखल झाला असून या दाव्याचे चौकशी कामी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. परंतु, तिऱ्हाईत इसम यांनी पूर्वीच्या प्रकरणांतील निकालाबाबत काय संदिग्धता आहे, याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. वर नमूद केलेप्रमाणे हा दावा प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना वादी क्र.१ ते ९ व प्रतिवादी

क्र.२ ते १२ यांनी पूर्वीच्या प्रकरणांमध्ये दिलेल्या अधिकारांचा गैरवापर करुन त्याने दावा मिळकतीला स्वतःच्या एकटयाच्या नावाची नोंद करुन घेऊन वादी यांचे दावा मिळकतीतील समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला, या कारणास्तव दाखल झाला आहे. वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये पूर्वीच्या प्रकरणातील निकालासंदर्भात संदिग्धता असलेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. वर नमूद केलेप्रमाणे रे.दि.मु.नं.२१/१९८४ या दाव्याचे काम मा.ना.सर्वोच्च न्यायालय पर्यंत चालवून त्या दाव्यातील दि.०३.०८.२०१० रोजीचा न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम झाला असून तिऱ्हाईत इसमांचे पूर्वहक्कदार गोपाळ मारुती गुरव व त्यांचे पश्चात तिऱ्हाईत इसम यांचेविरुध्द दावा मिळकती संदर्भात निरंतर ताकीद कायम झाली आहे. त्यामुळे, त्या प्रकरणी झालेल्या निकालांबाबत कोणतीही संदिग्धता नसल्याचे स्पष्ट दिसून येते.

**१४.** तिऱ्हाईत इसम यांनी त्यांचे या अर्जामध्ये अत्यंत मोघम स्वरुपाची कथने केली असून ते या दाव्याचे कामी का आवश्यक पक्षकार आहेत, याबाबत त्यांनी कोणतेही स्पष्ट कथन केलेले नाही. तिऱ्हाईत इसम यांनी याकामी निशाण ३५ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांचे कथनांनुसार दावा मिळकत सि.स.नं.११८३ हा त्यांचे मालकीच्या ग्रामपंचायत मिळकत नं.७८५ चा झाला आहे. सि.स.नं.११८३ हा वादी व प्रतिवादी यांचे ग्रामपंचायत मिळकत नं.७८७ बाबत झालेला नाही. परंतु, वादी यांनी निशाण ३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन व तिऱ्हाईत इसम यांनी निशाण ३५ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र.१ यांनी तिऱ्हाईत इसम यांचेविरुध्द मे.उपअधीक्षक, भूमी अभिलेख, खानापूर यांचेकडे क्र./नभू /फेरचौकशी अपील/१२/२०१२ चे दाखल केले होते व त्याकामी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, खानापूर–विटा यांनी चौकशी करुन दावा मिळकत सि.स.नं.११८३ हा वादी व प्रतिवादी यांचे ग्रामपंचायत मिळकत नं.७८७ चा झाल्याबाबत अनुमान नोंदवून प्रतिवादी क्र.१

यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या मालमत्ता पत्रकी करणेबाबत दि.१४.०८.२०१२ रोजी आदेश पारित केल्याचे दिसून येते. उपअधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर–विटा यांचा तो आदेश मे.उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचेपर्यंत कायम झाला आहे. तिऱ्हाईत इसम यांनी मे.उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचे दि.३१.०१.२०१४ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशाविरुध्द मा.महसूल मंत्री, मुंबई यांचेकडे सन २०२० साली रिव्हीजन अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. तो अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यामुळे, तिऱ्हाईत इसम यांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे वाद मिळकती संदर्भात दाद मागितली असल्याचे स्पष्ट दिसून येते. तिऱ्हाईत इसम व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यानचा तो वाद सक्षम प्राधिकारी यांचेकडे निर्णित होणार आहे. त्या कारणासाठी तिऱ्हाईत इसम यांना याकामी पुन्हा नव्याने वाद उपस्थित करणेची आवश्यकता नाही.

**१५.** वर नमूद विवेचनांवरुन तिऱ्हाईत इसम आणि वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान या न्यायालयातील रे.दि.मु.नं.२१/१९८४ या दाव्याचे कामकाज मा.ना.सर्वोच्च न्यायालय पर्यंत चालून त्या दाव्यातील दि.०३.०८.२०१० रोजीचा न्यायनिर्णय व हुकूमनामा कायम झाला आहे. त्या दाव्याचे कामी दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा मालकी हक्काचा कब्जा असल्याचे अनुमान नोंदवून तिऱ्हाईत इसम यांचे पूर्वहक्कदार गोपाळ मारुती गुरव यांचेविरुध्द निरंतर ताकीद कायम झाली आहे. त्याप्रकरणी झालेल्या निकालाबाबत कोणतीही संदिग्धता नाही. वादी यांनी दाखल केलेला हा दावा प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द निरंतर ताकिदीबाबत आहे. या दाव्याशी व दाव्यातील कारणाशी तिऱ्हाईत इसम यांचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी मे.उपअधीक्षक, भूमी अभिलेख, खानापूर–विटा यांचेकडे केलेल्या क्र./नभू/फेरचौकशी अपील/१२/२०१२ चे कामी दावा मिळकत सि.स.नं.११८३ हा वादी व प्रतिवादी यांचे ग्रामपंचायत मिळकत नं.७८७ बाबत

झाल्याचे अनुमान नोंदवून प्रतिवादी क्र.१ यांचे नाव दावा मिळकतीच्या मालमत्ता पत्रकी नोंदविणेबाबत आदेश झाला आहे. तो आदेश मे.उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचेपर्यंत कायम झाला आहे. तिऱ्हाईत इसम यांनी मे.उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचे दि.३१.०१.२०१४ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशाविरुध्द मा.महसूल मंत्री, मुंबई यांचेकडे सन २०२० साली रिव्हीजन अर्ज केला असून तो अद्याप प्रलंबित आहे. तिऱ्हाईत इसम हे त्याकामी वादी व प्रतिवादी यांचेविरुध्द योग्य ती दाद मागू शकतात. तिऱ्हाईत इसम आणि वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान दावा मिळकती संदर्भात असलेला वाद पूर्वीचे रे.दि.मु.नं.२१/१९८४ चे प्रकरणी गुणदोषांवर चौकशी होऊन निर्णित झाला आहे. त्यामुळे, तिऱ्हाईत इसम यांना पुन्हा नव्याने वादी व प्रतिवादी यांचेविरुध्द या दाव्याचे कामी वाद उपस्थित करता येणार नाही. या दाव्याचे स्वरुप पाहता तिऱ्हाईत इसम हे या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे, तिऱ्हाईत इसम यांना या दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील करुन घेणे योग्य व उचित होणार नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्रमांक २ बाबत

**१६.** वर नमूद विवेचनांवरुन तिऱ्हाईत इसम यांचा हा अर्ज खर्चासह नामंजूर करणेचे निर्णयाप्रत मी आलो आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :-

## आ दे श

तिऱ्हाईत इसम यांचा निशाण ३२ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.04.15 17:45:21 +0530

-

**दिनांक १३/०४/२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,**

**ता.खानापूर, जि.सांगली.**

*Case No : RCS No 625 of 2020*
*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*
*Name of the Stenographer:V.A.Mane*
*Court Name: 3rd Jt. Civil & Criminal Court, Vita. Dist. Sangli.*
*Date of decision : 13/04/2022*
*Order signed by P.O.on : 13/04/2022*
*Order uploaded on : 13/04/2022*